**प्रेसनोट** दि. 02/05/2026

**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे कडून आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर येथील महिला सहा.पोलीस निरीक्षक व खाजगी इसमावर याचेवर लाच मागणी व लाच स्विकारलेप्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे घटक** |
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलमान्वये |
| **तक्रारदार** | पुरुष वय 59 वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | 1) श्रीमती वैशाली मुरलीधर तोटेवार, वय 49 वर्षे पद- सहाय्यक पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा (वर्ग- 2), पुणे शहर, पत्ता- ऑफिसर क्वार्टर, बिल्डिंग नंबर 12, पहिला मजला, स्वारगेट पोलीस लाइन, स्वारगेट, पुणे, 2) संभाजी शिवाजी चव्हाण (खाजगी इसम), वय 47 वर्ष, रा 1219 सदाशिव पेठ, चिमण्या गणपती चौक, पुणे 30. |
| **सुरवातीची लाच मागणी** | रू.30,00,000/- (तीस लाख रुपये) |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी** | रू.28,00,000/- (अठ्ठावीस लाख रुपये) |
| **पडताळणी दिनांक** | दि. 30/04/2026 रोजी |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | रू.28,00,000/- (अठ्ठावीस लाख रुपये) |
| **सापळा दिनांक** | दि. 02/05/2026 रोजी 13.09 वाजता |
| **ठिकाण** | कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती निता मिसाळ,सहा.पोलीस आयुक्त,लाप्रवि,पुणे (मो.क्र. 9822214414) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री.सतीश वाळके, सहा. पोलीस आयुक्त, लाप्रवि, पुणे (मो.क्र.8087002020) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांनी आर्थिक गुन्हे शाखा, पुणे शहर येथे तक्रारी अर्ज दिला होता. त्या अर्जाची चौकशी आलोसे श्रीमती तोटेवार ह्या करत होत्या. तक्रारदार यांनी दिलेल्या अर्जामध्ये तक्रारदाराचे अर्जाची चौकशी तक्रारदार यांचे बाजूने करून त्यातील गैर अर्जदार यांच्या विरुद्ध कारवाई करून तक्रारदार यांची जमीन तक्रारदारांना परत करून देते याकरिता तक्रारदाराकडून या पूर्वी 2 लाख रुपये रक्कम स्वीकारून आणखी 30 लाख रुपये लाचेची मागणी केली म्हणुन तक्रारदार यांनी दिनांक 30/04/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे तक्रार दिली होती.

प्रस्तुत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. 30/04/26 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता, आरोपी लोकसेविका ए.पी.आय. श्रीमती. वैशाली तोटेवर यांनी त्यांच्या स्वतःसाठी तक्रारदार यांच्याकडे अर्जातील तक्रारदारांचे काम करून देते या कारणासाठी या पूर्वी 2 लाख रुपये स्विकारल्याचे मान्य करून तडजोडीअंती 28 लाख रुपये लाचेची मागणी केली असल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले आहे. तसेच आरोपी नंबर 2 खाजगी इसम यांनी लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे व लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याची निष्पन्न झाले आहे.

वर नमूद प्रमाणे लाच मागणी झाल्यानंतर दिनांक 02/05/2026 रोजी सापळा कारवाई केली असता लोकसेविका श्रीमती वैशाली तोटेवार यांनी पडताळणी दरम्यान खाजगी इसम नामे संभाजी शिवाजी चव्हाण यांचे जवळ पैसे देण्यासाठी सांगितले होते त्यानुसार सापळा कारवाई आयोजित केली असता खाजगी इसम संभाजी शिवाजी चव्हाण यांनी तक्रारदारांकडून पंचासमक्ष 28,00,000/- रुपये स्वीकारले असता त्यास हॉटेल कॉनराड च्या एंट्री गेट समोर, मंगलदास रोड, पुणे येथे रंगेहात पकडण्यात आले, त्यानंतर आलोसे श्रीमती तोटेवार यांना ताब्यात घेण्यात आले असून कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

वर नमुद दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध कोरेगाव पार्क पोलीस ठाणे, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक -020-26122134, 26132802, 26050423, **9403781064**
2) व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
4) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
5) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

सहायक पो आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक * ॲन्टी करप्शन ब्युरो * सत्यमेव जयते

DYSP 405

(सतिश संभाजी वाळके)
सहा.पोलीस आयुक्त/पो.उप.अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे